IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा व दशा

प्रा. डॉ. सिद्धार्थ एस. मेश्राम
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा– 441904

सारांश :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 1991 हा वर्ष भारतातील आर्थिक इतिहासात एक ऐतिहासीक वर्ष समजला गेला. 1991 च्या पूर्वी भारत एक गंभीर आर्थिक स्थितीतून मार्गक्रमण करीत होता. 1990 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेवर फार मोठे गंभीर संकट निर्माण झाले होते. विदेशी गंगाजळीत निर्माण झालेल्या तूटीमुळे विदेशी विनिमयाची गंभीर स्थिती निर्माण झाली. केवळ दोन आठवठा पुरेल इतकेच विदेशी चलन भारताच्या गंगाजळीत शिल्लक राहिले. यातून मार्ग काढण्यासाठी देशातील सुवर्णाचा साठा आंतरराष्ट्रीय वित्तिय संस्थांमध्ये गहाण ठेवण्याची नामुष्की पत्करावी लागली. या संकटामुळे भारताच्या आर्थिक धोरण निर्मात्यांना नवीन आर्थिक नीती ठरविण्यास बाहय केले. विदेशी गंगाजळीच्या गंभीर संकटामुळे अर्थव्यवस्थेवर उद्भवलेल्या विपरीत स्थितीमुळे तत्कालीन भारत सरकारला किंमत स्थैर्य आणि सरंचनात्मक सुधार निर्माण करण्यासाठी नवीन औद्योगिक धोरण स्वीकारल. राजकोषीय तुट आणि व्यापार शेषाचे असंतुलन सावरण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी अर्थव्यवस्थेतील त्रुटी व कमकुवतपणास दूर करणे अत्यावश्यक होते. त्यामुळे 24 जुलै 1991 ला तत्कालीन केंद्रिय वित्तमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांनी नवीन औद्योगिक नीतीचा अवलंब केला. परवाना पध्दती व संरचनात्मक उपायातील कठोर नियमांना दूर करणे व त्यात सुलभता व सरलता निर्माण करण्याकरिता नवीन आर्थिक सुधार कार्यक्रमांना अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्रात लागू करण्यात आले. या सुधार कार्यक्रमांमुळे सद्यः परिस्थितीत विदेशी गंगाजळीत लक्षणिय वाढ झाली आणि आज भारत मजबूत स्थितीत येऊन पोहचला व आंतरराष्ट्रीय मुद्रा निधो यासारख्या जागतिक वित्तीय संस्थांनाही मदत पुरविण्याइतपत सक्षम झाला.

यावरून लक्षात येते की, नवीन आर्थिक सुधार कार्यक्रमांमुळे ज्याला जागतिकीकरणाच्या नावाने ओळखले जाते, भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बराच अनुकूल परिणाम घडून आला. आंतरराष्ट्रीय व्यापारातील ही अनुकूलता आणि प्रतिकूलता अभ्यासणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे आयात व निर्यातीची रचना, दिशा व दशा याविषयी साधक–बाधक चर्चा करणे व वास्तविक वस्तुस्थिती अभ्यासणे सुध्दा प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे.

बीज संज्ञा : औद्योगिकरण, जागतिकीकरण, आयात–निर्यात, गंगाजळी, बेरोजगारी.

संशोधन प्रश्न :

1) आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे भारताच्या निर्यात क्षमतेवर कोणता परिणाम घडून आला.
2) आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे भारताच्या आयात क्षमतेवर कोणता परिणाम घडून आला.
3) जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे अर्थव्यवस्थेतील अनुकूलता आणि प्रतिकूलता कोणत्या क्षेत्रात व कशाप्रकारे प्रतिबिंबीत झाली.
4) अर्थव्यवस्थेपुढील निवडक आव्हाणे कोणती.

संशोधन पद्धतीशास्त्र :

प्रस्तुत संशोधन केवळ द्वितियक सामुग्रीवर आधारित आहे. संशोधनासाठी अनेक संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, मासिके, त्रैमासिके इत्यादी साधनांचा वापर केला आहे. लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा उपयोग केला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेतील स्थान :

1991 पासून भारत सरकारने महत्वपूर्ण आर्थिक सुधार कार्यक्रम योजल्यानंतर विदेशी व्यापार, उदारीकरण, वित्तिय उदारीकरण, कर सुधारणा आणि विदेशी गुंतवणूक नीती यामध्ये आमुलाग्र बदल केले. या बदलापासून भारतीय अर्थव्यवस्थेला सकारात्मक चालना मिळण्यास मोठी मदत झाली. तेव्हापासून भारतीय अर्थव्यवस्था अनेक क्षेत्रात यशस्वी ठरत गेली. 1951 ते 1991 या दरम्यान 4.34 प्रतिशत असलेला स्थूल देशांतर्गत राष्ट्रीय उत्पादन 6.24 टक्के पर्यंत वाढला. 2015 मध्ये भारतीय अर्थव्यवस्था 2 ट्रिलियन अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक झाली. म्हणजे 2017 मध्ये भारतीय अर्थव्यवस्था मानकाच्या आधारावर जगात 5 वी मोठी अर्थव्यवस्था आहे. 2014 मध्ये प्रकाशित झालेल्या अहवालामध्ये वर्ष 2011 ला जागतीक बँकेने क्रयशक्ती समतेच्या आधारावर भारताला जगातील सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था घोषित केली होती. जागतिक बँकेच्या इंटरनॅशनल कंपेरिजन प्रोग्राम (आईसीपी) च्या फेरीमध्ये अमेरिका आणि चीनच्या नंतर भारताला तिसरी मोठी अर्थव्यवस्था म्हणून स्थान दिले आहे. 2005 मध्ये ती 10 व्या स्थानी व 2003–04 मध्ये 12 व्या स्थानी होती. संयुक्त राष्ट्र सांख्यिकी विभाग (यूएनएसडी) चा पमुख सल्लागार डाटाबेस यांनी डिसेंबर 2013 मध्ये जगातील एकूण देशांच्या क्रमवारीनुसार (रँकिंग) सकल घरेलू उत्पादनाच्या आधारावर भारताचा क्रम 161 व्या स्थानी दर्शविला आहे. विश्व बँकेच्या क्रमवारीनुसार 2003 मध्ये भारताचे स्थान 143 व्या स्थानी होते. यावरून स्पष्ट होते की, भारताच्या जागतीक क्रमवारीतील स्थान स्थिर दिसून येत नाही. त्यात कधी कमी तर कधी जास्त असे क्रम बदलत होते. परंतु आज भारताची आर्थिक स्थिती सबळ झाली आहे व जगातील क्रमवारीतील स्थानही तिसऱ्या–चवथ्या स्थानावर जाऊन पोहचले. ही अभिमानाची बाब आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने भारताची आयात–निर्यातीची स्थिती काय? हे पाहणेही क्रमप्राप्त आहे. म्हणून भारताच्या आयातीची व निर्यातीची दिशेच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे विश्लेषण केले आहे.

जागतिकीकरणानंतर भारताच्या आयात–निर्यातीतील स्थान :

जागतिक निर्यात आणि आयातीमध्ये सन 2000 मध्ये असलेला वाटा क्रमशः 1.7 व 0.8 टक्क्यावरून वाढून सन 2013 मध्ये क्रमशः 1.7 व 2.5 टक्के असा झाला. भारताच्या एकूण वस्तु व्यापारात सुध्दा उल्लेखनिय सुधारणा झाली. 2000–01 मधील 21.8 टक्के असणारा सकल घरेलू उत्पादनातील हिस्सा 2013–14 मध्ये 44.1 टक्क्यानी वाढला.

भारताची वस्तुगत निर्यात 2013–14 मध्ये 312.6 बिलीयन अमेरिकी डॉलर (सीमा शुल्कच्या आधारावर) पर्यंत पोहचली. यात 2012–13 च्या तुलनेत 1.8 टक्के कमी असलेल्या निर्यातीच्या तुलनेत 4.1 टक्के वृध्दी नोंदविली गेली. 2012–13 च्या तुलनेत 2013–14 मध्ये आयातीच्या एकूण मुल्यात 8.3 प्रतिशत घट झाली. ज्याच प्रमुख कारण तेलाच्या आयातीमध्ये 12.8 प्रतिशत कमीची नोंद दिसून आली. सरकारी पातळीवर करण्यात आलेल्या अनेक उपायांमुळे 2011–12 तील 1075 टन असलेली सुवर्णाची आयात 2013–14 मध्ये 664 टन इतकी कमी झाली. किंमतीच्या आधारावर सोने व चांदीच्या आयातीत 2013–14 मध्ये 40.1 प्रतिशत असलेले प्रमाण आणि त्याचे एकूण मूल्य 33.4 बिलीयन अमेरिकी डॉलर होते. 2013–14 मध्ये झालेल्या जबरदस्त आयातीमधील घटीमुळे आणि निर्यातीमधील साधारण वृध्दीमुळे भारताचा 2012–13 मधील 190.3 बिलीयन अमेरिकी डॉलर असलेला व्यापार मूल्यातील ताटा 137.5 बिलीयन अमेरिकी डॉलर पर्यंत कमी झाला. ज्यामुळे चालू व्यापार शेषातील तोटा बराच संकुचित झाला. लक्षात घेण्यायोगी बाब अशी की जरी आज विदेशी गंगाजळी मोठया प्रमाणात वाढलेली दिसून येत असली तरी व्यापारशेष असंतुलितय आहे. 1991 च्या नवीन आर्थिक सुधार कार्यक्रमांमुळे व्यापाराची रचना व दिशा अनुकूल झाली असली, आंतरराष्ट्रीय व्यापारात लक्षणिय वाढ दिसून येत असली तरी निर्यातीच्या तुलनेत आयात सतत अधिकच राहिली. निर्यातीचे मूल्य आयातीच्या मूल्यापेक्षा कधीच वाढू शकले नाही. वस्तुच्या निर्यात–आयातीत समानता अजूनही दिसून येत नाही. सेवा क्षेत्रात मात्र निर्यातीचे मूल्य अधिक दिसून येते ही समाधानकारक बाब आहे.

आयात–निर्यातीची दिशा ठरवितांना कोरोना काळातील आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिणामही विचारात घेणे आवश्यक आहे. सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनामी ;ब्डप्द्ध च्या अहवालानुसार लॉकडाऊनमधील 20 एप्रिल 2019 पर्यंत 14 करोड लोक रोजगारीवरून बेकार झाले होते. ब्डप् चा हा पहिला अहवाल आहे. दुसरा अहवाल ब्प् चा असून (कॉनफेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री) च्या अहवालानुसार निर्देशित कालावधीत 30 करोड लोकांची रोजगारी जाऊन ते बेरोजगार झाले. आणि 15 मे 2019 पर्यंत आणखी 30 करोड लोकांची नोकरी जाण्याची संभावना व्यक्त करण्यात आली होती. संपूर्ण देशाच्या जवळ–जवळ 137 पेक्षा अधिक लोकसंख्येचा आकडा लक्षात घेतला तर 30 टक्के लोक बेरोजगार झाले असून 30 टक्के लोक पुन्हा बेरोजगार होतील हया संभावनाचा विचार करता भारतातील रोजगारीची दिशा प्रत्ययास येईल. जागतीक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेची उपरोक्त अवस्था लक्षात घेतली तर दृष्टीपटलावर येणारे दृष्य किती भयावह आहे हयाची प्रचिती येते. 2017 च्या पूर्वी तिसऱ्या स्थानावर असलेली अर्थव्यवस्था 5 व्या स्थानावर

गेली व बेकारीचे असेच प्रमाण अविरत असल्यास दारिद्रयाचे दृष्टचक्र किती वेगाने फिरत जाणार हयाचीही प्रचिती आल्याशिवाय राहणार नाही.

भारतातील रोजगार :

भारतीय अर्थव्यवस्थेमधील विभिन्न क्षेत्रात दिसून येणारी रोजगाराची स्थिती पुढीलप्रमाणे दर्शविलेली आहे.

| क्षेत्र / वर्ष | 1999–2000 | 2004–2005 | 2011–2012 |
|---|---|---|---|
| प्राथमक (कृषी व इतर) | 59.9 | 58.5 | 48.9 |
| द्वितियक (उद्योग व इतर) | 16.4 | 18.2 | 24.3 |
| तृतियक (सेवा) | 23.7 | 23.3 | 26.9 |

वरील तक्त्यात दर्शविल्यानुसार सन 1999 ते 2000 या वर्षात प्राथमिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या जनतेचे प्रमाण 59.9 टक्के व 2004–05 मध्ये 58.5 टक्के तर 2011–12 मध्ये 48.9 टक्के होते. अर्थात कृषी क्षेत्रावर अवलंबून असलेल्या जनतेच्या टक्केवारीत क्रमशः घट होत गेल्याचे दिसून येते.

द्वितियक क्षेत्राचा विचार करता क्रमशः 1999 ते 2000 या वर्षात 16.4 टक्के व 2004–05 मध्ये 18.2 टक्के तर 2011–12 मध्ये 24.3 टक्के याप्रमाणे वृध्दी होत असल्याचे दिसते.

तृतियक क्षेत्रात सन 1999–2000 मध्ये 23.7, 2004–05 मध्ये 23.3 व 2011–12 मध्ये 26.9 टक्के याप्रमाणे वाढतांना दिसून येते. अर्थात भारतीय अर्थव्यवस्था प्राथमिक क्षेत्रावर अधिक अवलंबून असलेल्या क्षेत्राचे अवलंबित्व हळूहळू कमी होऊन उद्योग व सेवा क्षेत्रात रोजगारी वाढत आहे. 2018–19 या वर्षात 7.5 टक्के असलेला सेवा क्षेत्राचा वाटा 2017–18 मध्ये 8.1 टक्के होता. 2017 मध्ये रोजगारात सेवा क्षेत्राचा वाटा 34 टक्के होता. 2020 मध्ये जगातील प्रमुख 12 देशांपैकी एकूण सेवा क्षेत्राचा जी.डी.पी. मधील वाटा पाहिला तर भारताचा क्रमांक अनुक्रमे 8 वा आणि 11 वा लागतो. या दोन्ही बाबतीत पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक युएसए, जपान व चीनचा लागतो. 2010 मध्ये युके, युएसए आणि फ्रान्स यांच्या जीडीपीमध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा अनुक्रमे 78.1 टक्के, 78.2 टक्के व 78.1 टक्के असा होता. भारताच्या बाबतीत हा हिस्सा 57 टक्के तर चीनच्या बाबतीत 41.8 टक्के असा होता. 2018–19 या वर्षात 10.6 दक्षलक्ष परदेशी पर्यटक आले. त्यातून 27.7 अब्ज परकीय चलनाची कमाई झाली.

2018–19 मध्ये विविध देशांबरोबर 28 द्विपक्षीय व बहुपक्षीय करार करण्यात आले. या देशांशी होणाऱ्या निर्यातीचे प्रमाण 36.9 दशांश टक्के होते. आणि निर्यात मूल्य 121.7 बिलीयन अमेरिकी डॉलर इतके होते. 2018–19 मध्ये भारताची निर्यात 23,07,663 कोटी रूपये होती व आयात 35,94,373 कोटी रूपये होती. सर्वात जास्त निर्यात झालेल्या वस्तूंमध्ये पेट्रोलियम उत्पादने,

मौल्यवान दगड, आषधांचे फॉर्मुले, सोने आणि अन्य किंमती धातूंचा समावेश आहे. सर्वात जास्त आयात वस्तूंमध्ये कच्चे तेल, मोती, मौल्यवान दगड आणि सोने यांचा समावेश आहे. भारताच्या प्रमुख व्यापार भागीदारांमध्ये अमेरिका, चीन, हांगकांग, संयुक्त अरब अमीरात आणि सौदी अरब यांचा समावेश आहे. डिसेंबर 2018 मध्ये भारतावर 521.1 बिलीयन डॉलर परकीय कर्ज होते. मार्च 2018 चा विचार करता ते 1.6 टक्क्यांनी कमी झाल. परदेशी कर्जामध्ये झालेली घट पाहता, भारताला आता दीर्घकाळ परदेशी कर्ज फेडावे लागणार नाही. परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या भागीदारीमध्ये वाढ झाली आहे आणि एकूण देयकाच्या तसेच एकूण पोर्टफोलिओ गुंतवणूकीमध्ये घट झाली आहे. यावरून असे दिसून येते की, चालू खात्याची तूट भरून काढण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी अधिक स्थिर स्रोतांचा विचार केला पाहिजे. भारतीय चलनाच्या संदर्भामध्ये रूपयाच्या अवमूल्यनामुळे 2018–19 या वर्षामध्ये निर्यात वृध्दी झाली. तसेच आयातीमध्ये घट दिसून आली. 2018–19 च्या एप्रिल ते डिसेंबर या काळामध्ये एकूण निधीचा ओघ मध्यम स्वरूपाचा होता. तर परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीचा ओघ (एफडीआय) तेजीत होता. यामागचे कारण म्हणजे पोर्टफोलियो गुंतवणूकीतून बाहेर पडण्याचे प्रमाण जास्त होते.

भारतीय अर्थव्यवस्थेपुढील यशापयश :

नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थवयवस्थेमध्ये मोठे परिवर्तन झालेले मानले जाते. 1991 च्या नवीन आर्थिक नीतीमुळे आर्थिक विकासाची रफ्तार तेजीने दिसून आली. या रफ्तारमध्ये पत्ययास येणारी प्रमुख बाब म्हणजे गरीबीच्या प्रमाणात आलेली घट ही आहे. 1991 च्या पूर्वी गरीबी घटण्याचे प्रमाण 0.44 टक्के असे होते. नवीन आर्थिक नीती अमलात आल्यानंतर गरीबी कमी होण्याचे प्रमाण 1.36 टक्के इतके झाले. नवीन आर्थिक धोरणानंतरच्या काळात जवळजवळ 13.80 करोड लोकांना गरिबी रेषेच्या वर आणण्यात यश मिळाले. परंतु याबरोबरच नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर उत्पन्नातील विषमताही तेवढयाच प्रमाणात वाढत असतांना दिसून आली.

1991 च्या आर्थिक नीतीच्या विवेचनामध्ये सकल घरेलू उत्पादनाच्या (जीडीपी) यशस्वीतेचाही विचार केला जाऊ शकतो. जीडीपीच्या सफलतेवर आणि असफलतेवर होणारा परिणाम विचारात घेता येतो. 1991 मध्ये भारताचा एकूण जीडीपी 5,86,212 करोड रूपये होता. आज तो जवळजवळ 20,00,000 करोड रूपये झालेला आहे. 1991 पूर्वी भारतीय अर्थव्यवस्थेत परदेशी गुंतवणूक नाहोच्या बरोबर होती. 1991 च्या आर्थिक सुधारच्या प्रथम वर्षात केवळ 7.40 करोड डॉलर एकूण गुंतवणूक होती. 2016–17 मध्ये परदेशी गुंतवणूक स्वातंत्र्यानंतरच्या सर्व आकडयांना मागे सोडून 60.08 अरब डॉलर पर्यंत वाढली.

थोडक्यात 1991 च्या नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात मोठी वाढ झाली. सेवा क्षेत्राच्या विकासात उतुंग भरारी मारली. विदेशी व्यापारात आमुलाग्र बदल घडून आले. निर्यात–आयात क्षमता लक्षणीय वाढली. अधिदान शेषातील असंतुलन दूर होऊन तूटीचा व्यापार शेष आधिक्यात रूपांतरीत झाला. जीडीपी दर सतत वाढत राहिला.

नवीन आर्थिक सुधार कार्यक्रम विभिन्न क्षेत्रात लागू केल्यामुळे त्याचे अतिशय सकारात्मक परिणाम मिळाले. हे सर्व यश नवीन आर्थिक धोरण म्हणजे जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण हया त्रिसुत्रीद्वारे कार्यान्वित केलेल्या कार्यक्रमांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील जलद आर्थिक विकासाला कारणीभूत ठरले. परंतु अलिप्त नसणारे व सर्वदूर दृष्टीस पडणारे एक अर्धसत्यही दृष्टीआड करून चालणार नाही. ते म्हणजे या धोरणामुळे निर्माण झालेले विविध सामजिक, आर्थिक व नैतिक दृष्परिणाम होत. यांना जागतिकीकरणाचे अपयश संबोधने वावगे होणार नाही. त्याविषयी थोडक्यात विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

नवीन आर्थिक धोरणाचे/जागतिकीकरणाचे दुष्परिणाम अथवा अपयश :

1) जागतिकीकरणात निर्माण झालेली बेरोजगारांची फौज :

जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वच घटकांना समान रूपाने लाभान्वित करता आले नाही. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबरच धनिक भांडवलदारांच्या विकासात मोठी भर पडली. कृषी प्रधान अर्थव्यवस्थेच्या अविकसीतपणाची दखल न घेता उद्योग व सेवा क्षेत्राच्या सुधारणेकडे सतत लक्ष पुरविण्यात आल्यामुळे कृषी क्षेत्र अविकसीतच राहिले. उद्योगधंद्यांच्या वाढीकडे व औद्योगीकरणामुळे भांडवलदार वर्ग अवाढव्य नफा मिळवू लागले. उत्पादनामध्ये नवनवीन तंत्र व यंत्रसामुग्रीचा अवलंब केल्यामुळे श्रमीकांची आवश्यकता कमी होऊ लागली. रोजगारी संकुचित झाली. या परिस्थित नैसर्गिक आपत्ती निर्माण होऊन श्रमीकांच्या बेरोजगारीत वाढ झाली. उद्योगधंद्याच्या विकासाबरोबर रोजगार वाढणे अपरिहार्य होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत रोजगार पातळीत ज्या प्रमाणात वाढ व्हावयास पाहिजे होते. त्याप्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत नाही. उलट कोरोना महामारीसारख्या संकटामुळे कुशल व अकुशल श्रमीकांचाही रोजगार गेला. यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे कोरोना महामारीच्या काळात भारतात 30 टक्के लोक रोजगारीवरून बेकार झाले आणि तेवढयाच प्रमाणात बेरोजगार होणार असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. याचा अर्थ श्रीमंताची श्रीमंती वाढत गेली आहे, तर गरीबांच्या गरीबीत पुन्हा भर पडत आहे. ही आर्थिक विषमता सामाजिक विषमतेला जन्म देणारी आहे. आर्थिकदृष्टया सबल व्यक्तींनाच सामाजिक प्रतिष्ठा लाभते व गरीब आणि दरिद्री व्यक्तींना लाचारी पत्करावी लागते. या लाचारीचे रूपांतर असंतोषात झाल्यास नैतिक अधःपतनाला सुरूवात होते. चोरी, डकैती, लुटमारसारख्या अनैतिक कृत्यांचा जन्म होते. म्हणून सामाजिक व आर्थिक विषमता वेळीच संपुष्टात आणणे गरजेचे असते. या दृष्टीकोनातून विचार केल्यास जागतिकीकरणातील आर्थिक विषमता समर्थनिय नाही व बेकारी आणि बेरोजगारी वांछनिय नाही.

2) समाजवादाकडून भांडवलवादाकडे वाटचाल :

1991 ला लागू करण्यात आलेले नवे औद्योगिक धोरण एकप्रकारे समाजवादाकडून भांडवलवादाकडे रूपांतरीत होणारे धोरण होय. मुक्त व्यापार, अनिर्बंध व्यापार, भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्टये आहेत. जे जागतिकीकरणाचे गोडवे गाणारे समर्थक आहेत ते अनिर्बध भांडवलशाहीच समर्थक आहेत. जे इंग्लंड, अमेरिका व पाश्चात्य युरोपीयन राष्ट्र आहेत

त्यांच्या विकासाचे स्वरूप वेगळे आहेत. व्यापारवादी व साम्राज्यवादी राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय व्यापार हे विकासाचे इंजिन ठरले ते विकसनशिल राष्ट्राच्याही विकासाचे इंजिन ठरतील हे समजणे चुकीचे आहे. भांडवलवादी विकसित राष्ट्रांची नियंत्रित लोकसंख्या, अल्प बेरोजगारी, कामगार हिताचे कायदे, श्रमीक संघटनांचे प्राबल्य हया सर्व बाबी त्यांच्या विकासाला पोषक आहेत. मात्र विकसनशील राष्ट्रांतील अतिरिक्त लोकसंख्या, अल्प रोजगार, बेकारी, दरिद्री, गरीबी यांच्या विकासाचे प्रारूप भांडवलशाहीच्या धोरणांपेक्षा वेगळे आहे आणि असायलाही पाहिजे. कल्याणकारी राज्य निर्मितीसाठी भारतासारख्या देशाला भांडवलशाहीचे प्रारूप मुळीच फायद्याचे नाही. आणि ते नियंत्रित भांडवलशाहीच्या धोरणाने राबविणे गरजेचे आहे. म्हणूनच पूर्व आशियाई राष्ट्रांच्या विकासाचे पारूप भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्येच्या गरीब राष्ट्रांना तारू शकते. थायलंड, सिंगापूर, मलेशिया व दक्षिण कोरीया या राष्ट्रांवर 1997–98 च्या काळात उद्‌भवलेले संकट इतके भयावह होते की, ही राष्ट्रे जगाच्या नकाशावर पुसले जाणार तर नाही अशी भीती निर्माण झाली होती. या राष्ट्रांनी त्यावर मात करण्यासाठी जे आर्थिक धोरण राबविले ते वाखाणण्याजोगे आहे. त्यांनी केवळ भांडवलशाही किंवा केवळ समाजवाद अवलंब न करता नियंत्रित भांडवलशाही म्हणजे मिश्रीत अर्थव्यवस्था स्वीकारली. एका बाजूला बहुराष्ट्रीय कंपन्याच्या स्वातंत्र्याबरोबरच सरकारी नियंत्रणाचे बंधन सोडून प्रारूप आखले नाही. प्रत्येक आर्थिक संस्था सरकारच्या नियंत्रणातूनच विकसित करण्याचे धोरण लागू केले. परिणामतः अवघ्या 10 वर्षाच्या अल्पावधीत दैदिप्यमान यश त्यांना संपादन करता आले. आर्थिक विकासाबरोबरच दारिद्रय निर्मूलन ही यशस्वी केल्या गेले. त्याकरिता या देशांनी जे विकास प्रारूप अमलात आणले ते प्रारूप भारतामध्येही लागू करण्यात आले तर विषमता, दरिद्री, बेकारी या सर्व समस्यांना न्याय मिळू शकेल. केवळ अनियंत्रित औद्योगीकरण, परवाना धोरण हे त्यावरील उपाय नाहीत. या आर्थिक कार्यक्रमांमुळे राष्ट्रीय संपत्तीत भर पडण्यास सहाय्य होईल. परंतु देशापुढील उपरोक्त अवांछनिय संकटावर मात करता येईलच असे नाही. आज या पूर्व आशियायी राष्ट्रांचे स्थान पाश्चिमात्य विकसित राष्ट्रांच्या बरोबर येऊन त्यांना पूर्व आशियायी वाघ म्हणून संबोधिले जाते.

3) भांडवलशाहीतील दोषांचे पुनर्जीवन :

आज भारतामध्ये जागतिकीकरण व नवीन आर्थिक धोरण स्वीकारून जवळ–जवळ 29–30 वर्ष होत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत आमुलाग्र बदलही घडून आले आहेत. राष्ट्रीय उत्पन्न वाढले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराची अर्थात आयात–निर्यातीचो क्षमता लक्षणिय वाढली आहे. परंतु निखळ भांडवलशाहीतील दोष निर्माण होऊन अनेक नव्या समस्यांचा जन्म होत आहे. म्हणून ‘भारत हा असा श्रीमंत देश आहे की, ज्यात गरीब लोक राहतात’ असे म्हटले जाते. भांडवलशाही विकसित देशांमध्ये अशाप्रकारच्या आर्थिक–सामाजिक विकास झालेला दिसून येतो की, ज्यात सर्वच जनता संपन्न आणि सुखी जीवन जगताहेत. हयाचे कारणे नियंत्रित लोकसंख्या व नैसर्गिक साधनसामग्रीचा युक्ततम वापर ही आहेत. कार्ल मार्क्सने मांडलेल्या भांडवलशाहीतील विसंगतीचे चित्र दृष्टीपुढे ठेवणे महत्वाचे आहे. अतिरिक्त मूल्य व वर्गसंघर्ष

यामुळे भांडवलशाहीच्या विकासातच तिच्या विनाशाचे बीजे रोवली आहेत. हे मार्क्सचे भाकित पाश्चात्य राष्ट्रांनी हेरले व त्यादृष्टीने आपल्या अर्थव्यवस्थांना मोड दिली. त्यामुळे मार्क्सचे भाकित चुकीचे ठरविण्यास भांडवलशाही राष्ट्रे सफल ठरली. भारतीय अर्थव्यवस्था केवळ विकासाच्या उंबरठयावर आहे. प्रचंड लोकसंख्या व अपर्याप्त रोजगार हयाचे भविष्यात भोगावे लागणारे दुष्परिणाम आजच लक्षात घेणे गरजेचे आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगिण विकासाला पोषक ठरतील या दृष्टीने आखले जातील, राबविले जातील, अशा प्रकारची दिशा निश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा असंतोषाची ठिणगी उडून लोकशाहीचे शिखर उध्वस्त होण्याची वेळ तर येणार नाही ही शंका योग्य वेळी थोपवून ठेवणे काळाची गरज आहे.

समारोप :

भारताने स्वीकार केलेल्या नवीन सुधार कार्यक्रमांमुळे भारतोय अर्थव्यवस्थेचे आकारमान, रचना विस्तृत झालेले दिसून येते. परंतु कोणताही विकास सर्वसमावेशक नसला तर त्याचे दुष्परिणामही अर्थव्यवस्थेला व जनतेला भोगावे लागतात. विकासाचा झरा खालच्या स्तरापर्यंत पसरत गेला तरच खऱ्या अर्थाने देशातील संपूर्ण जनतेचे महत्तम कल्याण साध्य होईल. विषमता, बेरोजगारी, दारिद्रय, भूखमरी हया मानवी कल्याणाच्या समस्या अर्थव्यवस्थेत दिसून यावयास नकोत. आर्थिक विकास साध्य करतांना शाश्वत विकासाची कास धरणे अत्यावश्यक आहे. 'जगा आणि जगू द्या' या उक्तीप्रमाणे आपणही सुखाने जगलो पाहिजे आणि आपल्या भविष्यातील पिढयांना सुखमय जीवन जगता येईल याकरिता नैसर्गिक साधनसामुग्रीचा युक्ततम वापर केला पाहिजे. तरच अर्थव्यवस्थेचा सर्वांगिण विकास सफल झाला असे म्हणता येईल व संपूर्ण मानवजातीचा उध्दार होईल. याकरिता 'भवतू सब्ब मंगलम्' ही उक्त यशस्वीपणे राबविणे गरजेचे आहे. आर्थिक विकासापेक्षा मानव विकास निर्देशांक महत्वाचा आहे, हे राज्यकर्त्यांनी समजून घेणे महत्वाचे आहे.

संदर्भसूची :


1. भागवत ॲडमिरल : 'जागतिकीकरण नवीन गुलामगिरी', समता प्रकाशन, समता सैनिक दल, डॉ. आंबेडकर उड्डान पूल, लष्करीबाग, नागपूर–17.
2. दत्त गौरव, महाजन अश्विनी : 'भारतीय अर्थव्यवस्था', एस. चन्द ॲण्ड कंपनी प्रा. लि. रामनगर, नई दिल्ली–110055.
3. गायकवाड मुकूंद : 'जागतिकीकरण शाप नव्हे वरदान', कॉन्टीनेंटल प्रकाशन, विजय नगर, पुणे–30.
4. दास्ताने संतोष : 'भारत एक पाहणी', दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे
5. जैन निरज : 'वैश्विकरण या पुनः औपनिवेशीकरण', गार्गी प्रकाशन, सहारणपूर (यु. पी.)
6. जाधव अपेक्षा : 'भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजन', निराली प्रकाशन, शिवाजी नगर, पुणे.

7. कांबळे उत्तम : 'जागतिकीकरणातील सांस्कृतिक संघर्ष', सुमन प्रकाशन, 569, सदाशिव पेठ, पुणे–411030.

8. खेर, सी. पं. 'दारिद्रयाची संकल्पना आणि निवारण', दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., 251–क, शनिवार पेठ, पुणे–411030.

9. कराडे जगन : 'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने', डायमण्ड पब्लिकेशन्स, 264/3, शनिवार पेठ, 302, अनुग्रह अपार्टमेंट, ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे–411030.

10. निकम अविनाश : 'अर्थसंवाद', जानेवारी–मार्च 2012, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा–425409, जिल्हा नंदूरबार.

11. साठे मधुसूदन : 'जागतिक अर्थकारण, नव्या जगाचे अर्थकारण', डायमण्ड पब्लिकेशन्स, पुणे–30.

12. साठे मधुसूदन : 'भारताच्या आर्थिक समस्या', भाग–5, आर्थिक सुधारणा आणि वाढ, डायमण्ड पब्लिकेशन्स, पुणे–30.

13. साठे मधुसूदन : 'जागतिक अर्थकारण : आशियातील अर्थव्यवस्था', डायमण्ड पब्लिकेशन्स, पुणे–30.

14. शर्मा ओ. पी. : 'भारत में नियोजित विकास और आर्थिक उदारीकरण', आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, एम.एस.एस. हाइवे, जयपूर (राजस्थान).

15. सिंह रमेश : 'भारतीय अर्थव्यवस्था', एमसीग्रेव हिल एज्युकेशन (इंडिया) प्रायवेट लिमीटेड, चेन्नई–600116.

16. शर्मा ओ. पी. : 'भारतीय अर्थव्यवस्था नई शताब्दी में', आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, एम. एस.एस. हाइवे, जयपूर (राजस्थान).

17. वावरे अनिलकुमार : 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र', एज्युकेशनल पब्लिशर्स, घाटगे बाळासाहेब ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

18. झामरे जी. एन. : 'भारतीय अर्थव्यवस्था भाग–1', पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

19- pib.gov.in>pressReleaseframepage 04 Jul. 2019

20- W. M. Wikipedia.org

21- m.jagranjosh.com Mar. 21, 2016 Hemant Singh